महाराष्ट्र शासन
आरोग्य सेवा
जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय सामान्य रुग्णालय, नांदेड

कार्यालय ०२४६२- २३४३०७/ २४५४१६
फॅक्स ०२४६२- २३४७५०/ २४५५२६

पत्ता मेनरोड, म.न.पा जवळ, वजिराबाद, नांदेड -४३१६०१
इमेल: cs_nanded@rediffmail.com

जाक/जिशचि/कोविड-१९/आस्था/ 2704 /१९
दि-26/02/२०२१

संदर्भ : १) SRTUMUN प्रयोगशाळेच्या संचालकांचे पत्र दि १-१-२०२१.
२) उपसंचालक आरोग्य सेवा लातूर यांचा ईमेल संदेश दि. ९-६-२०२०.
३) मा. जिल्हाधिकारी यांच्या सोबत झालेली चर्चा दि. २३-२-२०२१.

## नियुक्ती आदेश

राज्यात कोरोनाचा (कोविड -१९) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृश परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे मनुष्यबळ भरण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या असून SRTMUN येथील CABIIF प्रयोगशाळेमध्ये अतिरिक्त DEO यांची आवश्यकता असल्याचे संदर्भ १ अन्वये SRTUMUN प्रयोगशाळेच्या संचालकांनी या कार्यालयास मागणीपत्र सादर केले आहे.

त्यानुसार संदर्भ २ अन्वये मा. उपसंचालक यांच्याकडून प्राप्त झालेल्या यादीतील उमेदवारांना आदेशित करण्याबाबत संदर्भ ३ अन्वये मा. जिल्हधिकारी यांनी यांनी दिलेल्या सूचनेनुसार खालील विवरण पत्रात नमूद केलेल्या उमेदवारांच्या नावासमोर विनिर्दीष्टीत केलेल्या ठिकाणी व देय मानधनावर निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात नियुक्ती खालील अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.

| Name of Candidate | Post | Name of Institutes | Salary |
|---|---|---|---|
| Chitra Sambhaji Jondhale | DEO | SRTMUN CABIIF LAB | १७०००/- |
| Bhinge Prakash Dhondiba | DEO | SRTMUN CABIIF LAB | १७०००/- |

### नियुक्तीबाबत अटी व शर्ती :-

१) आपली नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी असून उमेदवारांना आदेश निर्गमित केल्यापासून ३ महिन्याच्या कालावधीपर्यंत किंवा कोव्हीड-१९ साथ असेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधी करिताच अस्तित्वात राहील.
२) आपण सदर आदेशाच्या दिनांकापासून २ दिवसाच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणे आवश्यक आहे अन्यथा आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल तसेच आपणास विहित नमुन्यातील करार पत्र रु १०० च्या बॉंड पेपरवर तयार करून नेमणुकीच्या ठिकाणी सादर करणे अनिवार्य आहे.
३) आपली नियुक्ती करार पद्धतीने झालेली असल्याने आपणास एकत्रित वेतनाशिवाय अन्य कोणताही भत्ता लागू राहणार नाही.
४) आपली नेमणूक ही कोरोनाचा (कोविड -१९) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृश परिस्थिती हाताळण्यासाठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने झाली असल्याने या नेमणूकीबाबत आपणास कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
५) शासन सेवा व शर्तीखाली ही नेमणूक नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास आपण पात्र नसून ज्या पदावर नेमणूक झाली आहे त्या पदावर विहित नमुन्यातील करारामध्ये नमूद केलेल्या मुदतीबाहेर कोणतेही अधिकार राहणार नाहीत.
६) नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करून न राहिल्यास आपली नेमणूक रद्द करण्याचा अधिकार जिल्हा प्रशासनास राहील.
७) वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे अनिवार्य राहील.
८) नेमणुकीच्या मुख्यालयाच्या ठिकाणी हजर होण्यास कोणताही प्रवास भत्ता दिला जाणार नाही.
९) नेमणुकीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर आपली सेवा आपोआप समाप्त होईल. तशी पूर्व सूचना देण्यात येणार नाही.
१०) आपल्या कार्यक्षेत्रात काम करताना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता व महागाई भत्ता मिळणार नाही
११) आपल्या विरुद्ध एखाद्या गुन्ह्याची नोंद आढळून आल्यास आणि संबंधित गुन्हा सिद्ध झाल्यास आपणास कोणतीही पूर्व सूचना न देता आपली कंत्राटी सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

(डॉ. नि.ई. भोसीकर)
जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड

प्रति, वरील प्रमाणे संबंधितास

**प्रत कार्यवाहीस्तव :- संचालक, SRTMUN CABIIF LAB** यांना देवून कळविण्यात येते की, संबंधित रुजू करून घेण्यात यावे तसेच त्यांचा रुजू अहवाल या कार्यालयास सादर करून त्यांचे हजेरीपत्रक या कार्यालयाकडे दरमहा लेखा विभागास सादर करावे.

**प्रत माहितीसाठी :-** लेखा विभाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय , जि.प. नांदेड व प्रस्तुत कार्यालय

**प्रत सविनय सादर-**
- मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
- मा. जिल्हाधिकारी, नांदेड
- मा. उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर